दुरध्वनी क्रमांक -०२०-२५५०१३३
खात्याचे नाव व पत्ता - कार्यकारी अभियंता
बांधकाम विकास विभाग झोन क्र. २,
स्वा.सावरकर उद्योग भवन, चौथा मजला
पुणे महानगरपालिका कार्यालयीन वेळ ९.४५ ते ६.१५
जा.क्र. शअजा/झोन२/ ७९३८
दि. २७/११/२०२५

अपिल प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका.
अपिल क्रमांक : पुणे महानगरपालिका /अ.प्रा. तथा उप अभियंता /अपिल क्र.११
दि. १४/११/२०२५

अपिलकर्त्याचे नाव व पत्ता :- श्रीमती दिपाली हेमंत शर्मा
साई विहारसह, संस्था, पहिला मजला,
फ्लॅट नं. ६, पुण्याई नगर, धनकवडी, पुणे ४११०४३
जन माहिती अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा :- विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. प्रविण भावसार
तथा उप अभियंता
बांधकाम विकास विभाग झोन क्र.२
अपिलकर्ता :- श्रीमती दिपाली हेमंत शर्मा
विरूध्द
जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,
पुणे महानगरपालिका.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

माहिती अधिकारातील अर्जाचा तपशिल				
माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक	माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक	अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक	अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक	अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक
१	२	३	४	५
आ.क्र.झोन२/६०१५ दि.११/०९/२०२५	दि.१०/१०/२०२५	दि.०८/१०/२०२५	-	दि.०८/१०/२०२५

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण :- माहिती मिळाली नाही.

प्रथम अपिल अर्जाचा तपशिल				
प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक	प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक	प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का?	प्रथम अपिलाच्या विलंबाबावत निवेदन दिले आहे का?	प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक
१	२	३	४	५
दि.०७/११/२०२५	आ.क्र.झोन२/७५१८ दि.२८/१०/२०२५	होय	--	दि.१०/११/२०२५

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि.१४/११/२०२५ वेळ ४.०० वा.
सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित
सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी :- उपस्थित

जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या उत्तराचा /माहितीचा तपशिल :-

अ.क्र.	अर्जदाराने मागितलेली माहिती	उत्तर
१	दिनांक २८/११/२०२३ रोजीचा माझा तक्रारीअर्ज आपल्या कार्यालयाकडे वर्ग करण्यात आल्यानंतर माझाअर्जी कोणत्या अधिकारी पर्यंत कधी पोहोचला व तो अर्ज किती वेळ त्या अधिकारीकडे राहिला आणि त्याअधिकारीने तक्रारीअर्जावर काय काय कार्यवाही केली ह्याबद्दल सविस्तर माहिती मिळावी.	याबाबत माहिती सोबत देत आहोत.
२	दिनांक २८/११/२०२३ रोजीच्या अर्जावर ज्या अधिकारींनी कारवाई करायची होती आणि ज्या अधिकारींनी अंतिम निर्णय घ्यायचा होता त्या अधिकारींची नावे व पदनाम तसेच अर्जाशी संबंधित दस्तऐवजाच्या प्रती फाईल नोटिंगसह मिळाव्यात.	कनिष्ठ अभियंता, पुणे महानगरपालिका उप अभियंता, पुणे महानगरपालिका अर्जाच्या संबंधित नोटिंगच्या प्रती या कार्यालयाकडे उपलब्ध नाहीत.
३	बांधकाम विकास विभाग झोन २ कार्यालयाने दि २२/०२/२०२४ आणि दि. १८/०६/२०२४ रोजी साई विहार सोसायटीचे चेअरमन, सेक्रेटरी यांना अनधिकृत बांधकामाबाबत नोटीस पाठवली होती त्या नोटिशीनंतर किती दिवसात सोसायटीवर कारवाई केली गेली त्याबददल तारखे सहित माहिती मिळावी.	सोबत कारवाई रिर्पोटची प्रत देत आहोत.
४	टेरेसवरील अनधिकृत बांधकामावर कारवाई करते वेळी अतिक्रमण विभागाचे कर्मचाऱ्यांची संख्या मिळावी	सोबत कारवाई रिर्पोटची प्रत देत आहोत.
५	टेरेसवरील कारवाई वेळी सोबत बिगारी सेवकाची सख्या मिळावी	सोबत कारवाई रिर्पोटची प्रत देत आहोत.
६	कारवाई करते वेळी पोलिसांचे किती लोकं सोबत होती त्याची संख्या मिळावी	सोबत कारवाई रिर्पोटची प्रत देत आहोत.
७	अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याकरिता जे सी बी तसेच ब्रेकर, गॅस कटर यांची प्रत्येकी संख्या मिळावी	१ जेसीबी, २ गॅस कटर इतकी मागणी केली जाते.
८	विनापरवाना असलेल्या एकूण किती क्षेत्रफळावर किती तासात कारवाई झाली त्याबद्दल माहिती मिळावी	कारवाई रिर्पोट जोडलेला आहे.
९	बांधकाम विकास विभाग झोन २ तसेच अतिक्रमण विभाग याना साई विहार सोसायटीवरील विनापरवाना बांधकामावर कारवाई करिता आलेल्या एकूण एक खर्चाचे सविस्तर तपशील मिळावे.	आपण विचारणा केलेली माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही.
१०	पुणे महानगर पालिकेला सोसायटीवरील कारवाई करिता आलेला एकूण खर्च चेअरमन व सेक्रेटरी, साई वि सोसायटी कडून कोणत्या प्रकारे वसूल करण्यात आला त्याबद्दल सविस्तर माहिती व प्रति मिळाव्यात. (खर्च संबंधी माहिती नसल्यास संबंधित खात्याकडून मागवून द्यावी)	वसुलीबाबत कागदपत्रे उपलब्ध नाहीत.

विवेचन

अपिलार्थी श्रीमती दिपाली हेमंत शर्मा यांनी आ क झोन२/६०११ दि ११/०१/२०२५ अन्वये माहिती अधिकार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद मुद्दा क्र १ ते १० बाबतची माहितीची मागणी केलेली आहे.

अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री प्रविण भावसार यांनी आ क्र ५१२३ दि.०८/१०/२०२५ अन्वये मुदतीमध्ये मुद्दा क्र १ ते १० बाबतची माहिती कळविलेली आहे. अपिलार्थी श्रीमती दिपाली हेमंत शर्मा यांनी आ क्र ७५१८ दि २८/१०/२०२८ प्रथम अपिलाचा अर्ज दाखल केलेले आहे. अपिल अर्जामध्ये मुळ अर्जातील मुद्दा क्र ९ व १० बदल माहिती दिली नसल्याच्या कारणास्तव अपिल अर्ज दाखल केला आहे. अपिजास श्री हेमत शर्मा उपस्थित होते.

सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी श्री. प्रविण भावसार यांनी अपिलार्थी याच्या मुद्दा क्र. ९ व १० बाबतची माहिती उपलब्ध नसल्याचे नमूद केले. तसेच याबाबत कार्यवाही सुरू असल्याचे देखील सांगितले. वरीलप्रमाणे अवलोकन करता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (६) अन्वये आदेश

१) अपिलार्थी यांनी मागितलेली मुद्दा क्र. ९ व १० बाबतची माहिती उपलब्ध नसल्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना मुदतीमध्येच कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे कळविल्याचे निदर्शनास येते. तथापी सद्यस्थितीत त्यांनी मागितलेल्या माहितीबाबत कार्यवाही सुरू असल्याने माहिती उपलब्ध झाल्यावर १५ दिवसाच्या आता अपिलार्थी यांना पोस्टा व्दारे विनामुल्य माहिती उपलब्ध करून देण्यात यावी.

२) प्रथम अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

२७/११

विलास नवाळी
प्रथम अपिलीय अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता
बांधकाम विकास विभाग झोन क्र.२,
पुणे महानगरपालिका.
९६८९९३१८३१

दिनांक :- ठिकाण :- पुणे

टिप :- १) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसांच्या मुदतीत मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नविन प्रशासकीय इमारत, ४ था मजला , पुणे यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

२) या आदेशांची प्रत पुणे महानगरपालिकेच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत,
जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
बांधकाम विकास विभाग झोन क्र. २
पुणे महानगरपालिका